## राज्य ई गव्हर्नन्स कार्यक्रम( १०० % राज्य पुरस्कृत)(कृषी आयुक्तालय स्तर)

महाराष्ट्र राज्यामध्ये कृषि विभागामध्ये माहिती तंत्रज्ञानाचा वापर केला जातो. माहिती तंत्रज्ञान विषयक कार्यवाही राज्य ई गव्हर्नन्स कार्यक्रम (१०० % राज्य पुरस्कृत) अंतर्गत राबविली जाते. कृषी विद्यापीठातील शास्त्रज्ञांचे संदेश, हवामानाचा अंदाज, कीड व रोग यावरील उपाययोजना इ बाबत ची माहिती शेतकर्यांना कृषी विभागाच्या विविध आज्ञावल्या, वेब पोर्टल, मोबाईल अँप्लीकेशन,टोल फ्री क्रमांक, फेसबुक, यु टयूब, blog spot याद्वारे प्राप्त होत आहे. विभागासाठी नवीन आज्ञावली विकसित करणे त्यांची देखभाल करणे, इंटरनेट सुविधा व सायबर सिक्युरिटी साठी आवश्यक कार्यवाही करणे तसेच सँटेलाईट व ड्रोन तंत्रज्ञानाचा कृषी क्षेत्रात वापर करणे या प्रमुख उद्दिष्टांसाठी कृषी आयुक्तालय स्तर, कृषी विभाग, पुणे या कार्यान्वित यंत्रणेमार्फत संपूर्ण महाराष्ट्र राज्यात सदर योजना राबविली जाते.

**महाअॅग्रीटेक:**

- आधुनिक तंत्रज्ञानाचा अधिकतम वापर करुन विशेषत: सॅटेलाईट इमेजिंग व ड्रोन तंत्रज्ञानाच्या सहाय्यानेपिकनिहाय क्षेत्राची अचूकगणना करणे, लागवड केलेल्या पिकांचे आरोग्य सर्वेक्षण करणे , पिकांचे काढणी- पश्चात येणाऱ्या उत्पादनाचे अनुमानकाढणे आणि प्रकल्पांतर्गत विकसित केलेल्या विविध संगणकीय प्रणाली परस्परांना जोडून माहिती एकत्रीकरणाद्वारे शेतक-यांसाठी अचूक सल्ला व मार्गदर्शन करणारे एकात्मिक संगणकीय व मोबाईल अॅप्लीकेशन प्रणाली तयार करणे हे या प्रकल्पाचे प्रमुख उद्देश आहेत.
- **MRSAC ,नागपूर वNRSC, हैद्राबाद यांच्या सहकार्याने कृषि विभागाने महाअॅग्रीटेक हा प्रकल्प २०१९ मध्ये कार्यान्वित केला आहे .**
- पत्रिका ,CROPSAP ,MAHARAIN या आज्ञावल्यांचे integration करण्यात आले आहे .

**एमकिसान एस एम एस सेवा:**

- कृषि विषयक हवामान सल्लागारपीट ,अतिवृष्टी चक्रीवादळ ,किडरोगांचा प्रादुर्भाव ,बाजारभाव इ, बाबत विशेष सल्ला नोंदणीकृत शेतक.यांना मोफत देण्यात येतो .
- राज्यातील एकूण १३२ लाख शेतकर्यापैकी नोंदणीकृत असलेल्या शेतक-यांची संख्या ६६.४९ लाख(५०%)
- महाराष्ट्र राज्य देशपातळीवर प्रथम क्रमांकावर आहे

| अ क्र. | सल्ला पाठविण्याचा कालावधी | सल्ला सख्या | संदेश संख्या |
|---|---|---|---|
| १ | १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२० | १५१६ | ७.०५ कोटी |
| २ | १ एप्रिल २०२० ते ३१ मार्च २०२१ | ९३२ | ५.९१ कोटी |

**किसान कॉल सेंटर - टोल फ्री क्रमांक-१८०० १८० १५५१**

- सुरुवात २१ जानेवारी २००४
- केंद्र शासनकडून सदर सेवा इफको किसान या कंपनीमार्फत महाराष्ट्र राज्यासाठी सुरु आहे.
- महाराष्ट आणि गोआ चे ऑफिस पुणे इथे कार्यरत आहे,६५ कर्मचारी कार्यरत
- एकूण वर्षभरात(२०२०-२१) ८,५५,००० फोन शेतकऱ्यानं कडून पूर्ण महाराष्ट्रतुन येऊन गेलेत,

- शेतकऱ्यांचे प्रश्न -हवामान अंदाज,सरकारी योजना,बाजार भाव,पीक,कीड आणि रोग व्यवस्थापन, पिकांच्या जाती,खत आणि पाणी व्यवस्थापन तण नियंत्रण,फळं बहार व्यवस्थापन,शेती मधील आधुनिक तंत्र ज्ञान या बद्दल माहिती दिली जातंय.
- कर्मचाऱ्यांना डिपार्टमेंट ऑफ अग्रीकल्चर,ATMA आणि कृषी विद्यापीठ मार्फत वेळोवेळी हंगामी प्रशिक्ष पण दिली जातंय

**टोल फ्री कॉल सेंटर:**

राज्य कृषि विभागाची शेतक-यांसाठी टोल फ्री क्रमांक .१८०० २३३ ४०००सेवा कार्यान्वित.या सेवेव्दारे शेतक-यांना खते ,बियाणे ,किटकनाशके यांचे पुरवठा व तक्रारीबाबतचे निराकरण मोफतकरण्यात येते, तसेच कृषिविषयक मार्गदर्शनही मोफत करण्यात येते.**टोल फ्री कॉल सेंटर** चेसंनियंत्रण कृषी आयुक्तालय मार्फत केले जाते

## महाडिबीटी पोर्टल

महाराष्ट्र शासन कृषि विभागामार्फत शेतक-यांच्या प्रगतीसाठी विविध योजना राबविल्या जातात. सदर योजनांचा लाभ घेण्यासाठी कृषि विभागामार्फत महाडीबीटी (MahaDBT) ही संगणकीय ऑनलाईन प्रणाली विकसित करण्यात आलेली आहे. शेतक-यांसाठी खालील योजना DBT तत्वावर राबविण्यात येत आहेत. योजनेच्या लाभाची रक्कम त्यांचे बॅक खात्यावर वर्ग करण्यात येते. यासाठी महाडिबीटी पोर्टलवर https://mahadbtmahait.gov.in/ **शेतकरी य़ोजना** या सदराखाली जाऊन खालीलप्रमाणे दिलेल्या विविध लाभाच्या घटकांसाठी शेतकरी अर्ज करु शकतात. यासाठी शेतक-यांनी जवळच्या सामूहिक सुविधा केंद्र किंवा महासेतू केंद्रावर जाऊन नोंदणी करुन इच्छुक लाभाच्या घटकासाठी अर्ज करु शकतात. पोर्टलवर प्राप्त झालेल्या अर्जाची कृषि विभागामार्फत संगणकीय सोडत काढण्यात येते व सोडती मध्ये निवड झालेल्या शेतक-यांना लघुसंदेशाद्वारे पुर्वसूचना दिली जाते. यानंतर शेतक-यांनी आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावी लागतात. शेतक-यांनाकडून सादर केलेल्या कागदपत्राची छाननी कृषि विभागामार्फत करण्यात येऊन छाननी मध्ये पात्र झालेल्या लाभार्थ्यांना पुर्वसंमती दिली जाते. पुर्वसंमती दिल्यानंतर शेतक-यांनी घटकांची खरेदी करुन खरेदीची देयके तसेच आवश्यक कागदपत्रे पोर्टलवर अपलोड करावे लागतात.

शेतक-यांना सामुहीक सुविधा केंद्रे किंवा महासेतू या ठिकाणी जाऊन कागदपत्रे अपलोड करणे काही कारणामुळे शक्य होत नाही यासाठी शेतक-यांची गैरसोय दूर व्हावी म्हणून कृषि विभागाने शेतक-यांच्या सोई करिता **MahaDBT Farmer** नावाचे Android Application उपलब्ध करुन दिले आहे. सदर ॲप्लीकेशन शेतक-यांनी गुगल प्लेस्टोअर वरुन डाऊनलोड करुन घ्यावे. त्यामुळे मुळ कागदपत्रे सामुहिक सुविधा केंद्रे व महासेतू केंद्राकडे अथवा कृषि विभागाकडे सादर करण्याची आवश्यकता नाही.

१) वैयक्तिक लाभार्थी/ शेतकरी यांच्या करीता योजना-

| अ.क्र | योजनेचे नाव | योजने अंतर्गत लाभाच्या बाबी |
|---|---|---|
| १ | राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान (तृणधान्य, भरडधान्य, कडधान्य, गळीतधान्य, भात, कापूस, ऊस) | पिकनिहाय आधारित सिंचन साधने सुविधा व यंत्र व औजारे यासाठी लाभ दिला जातो. उदा. इलेक्ट्रीक मोटार, डिझेल इंजिन, पीव्हीसी पाईप्स, पेरणी यंत्र, बीबीएफ पेरणी यंत्र, मळणी यंत्र, तसेच बियाणे, पिक संरक्षण औषधे, सुक्ष्म मुलद्रव्ये इ. घटकांना लाभ दिला जातो. |
| २ | कृषि यांत्रिकीकरण उप-अभियान (Farm Submission) | विविध यंत्रे/औजारे घटकांकरीता विविध लाभ दिला जातो. उदा. रोटाव्हेटर, ट्रॅक्टर, पॉवर टिलर, नांगर, पेरणी यंत्र, BBF पेरणी यंत्र, मळणी यंत्र, प्लॅटर, रिझर, पॉवर विडर, स्प्रेअर्स, रिपर व इतर यंत्र. |
| ३ | राज्य पुरस्कृत कृषि यांत्रिकीकरण योजना | |

| | | |
|---|---|---|
| ४ | राष्ट्रीय कृषि विकास योजनेंतर्गत कृषि यांत्रिकीकरण | |
| ५ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान | ट्रॅक्टर, पॉवर टिलर, हरितगृह, शेडनेट, कांदाचाळ, शेततळे अस्तरीकरण, प्लॅस्टिक मल्चिंग, क्षेत्रविस्तार घटक, पिक संरक्षण उपकरणे, काढणी पश्चात व्यवस्थापन (पॅक हाऊस, शीतगृह, रिफर व्हॅन, फिरते विक्री केंद्र व इ.) जुन्या फळबागांचे पुन:र्जीवन, आळंबी उत्पादन व नर्सरी. |
| ६ | प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना (PMKSY) | ठिंबक व तुषार सिंचन संच साधनांचा लाभ देण्यात येतो. |
| ७ | SC/ST शेतक-यांसाठी वैयक्तिक लाभाच्या योजना<br>१) बिरसा मुंडा कृषि क्रांती योजना<br>२) डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजना | या योजनेंतर्गत नवीन विहीर बांधकाम, जुनी विहिर दुरुस्ती, इनवेल बोरिंग, पंपसंच, वीज जोडणी आकार, शेततळाचे प्लॅस्टिक अस्तरीकरण, सूक्ष्मसिंचन संच (ठिबक व तुषार), सोलर पंप |

२) शेतकरी गट/ शेतकरी कंपनी/शेतकरी संघ साठी कृषि विभागाच्या योजना

| अ.क्र | योजनेचे नाव | योजने अंतर्गत लाभाच्या बाबी |
|---|---|---|
| १ | कृषि यांत्रिकीकरण उपअभियान (कृषि औजारे बॅक स्थापना) | विविध यंत्रे/औजारे घटकांकरीता विविध लाभ दिला जातो. उदा. रोटाव्हेटर, ट्रॅक्टर, पॉवर टिलर, नांगर, पेरणी यंत्र, BBF पेरणी यंत्र, मळणी यंत्र, प्लॅटर, रिझर, पॉवर विडर, स्प्रेअर्स रिपर व इतर यंत्र |
| २ | एकात्मिक फलोत्पादन विकास अभियान | पॉलीहाऊस, शेडनेट, हरितगृह, प्लॅस्टिक मल्चिंग, आळिबी उत्पादन, प्राथमिक प्रक्रिया केंद्र. नर्सरी, काढणी पश्चात व्यवस्थापन (कांदाचाळ, रेफरव्हॅन इ.) |

- शेतक-यांना तसेच विभागाच्या अधिकारी व कर्मचारी यांना पोर्टल User friendly होण्याच्या दृष्टीने खालील महत्त्वपुर्ण बदल करण्यात आले असून पोर्टल अद्यावत करण्याचे काम सरु आहे.
- सोडतीमध्ये निवड झालेल्या शेतक-यांना डॉक्युमेट व ईन्व्हाईस upload करण्साठई MahaDBT Farmer नावाचे मोबाईल ॲप उपलब्ध करुन दिलेले आहे.
- डॉक्युमेट अपलोड करणेसाठी आता वेळेचे बंधन लावण्यात आले असून १० दिवसाचा कालावधी करण्यात आला आहे. तसेच Invoice अपलोड करणेसाठी ३० दिवसाचा कालावधी केला आहे. सदर कालावधीत शेतक-यांनी Document upload न केल्यास Auto delete होईल.
- अर्ज करताना बॅक खाते क्रमांक चुकीचा टाकल्यास शेतक-याला स्वत:च्या लॉगीनमधून Edit करता येईल.
- शेतक-यांना अर्ज करताना Non Aadhar Profile मधून लॉटरी लागली असल्यास शेतकरी स्वत:च्या लॉगीन मधून आधार नंबर अपडेट करुन घ्यावे व प्राधान्याने आधार बेस्ड प्रोफाईला प्राधान्य द्यावे.
- मागील ७ वर्षात शेतकरी ठराविक Survey number वर लाभ घेतला असल्यास त्यांची पडताळणी करणेसाठी मागील ७ वर्षाचा Legacy Data पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

- शेतक-यांना लॉटरीमध्ये निवड झाल्याचे, कागदपत्रे अपलोड करण्यासाठी, ईन्व्हाईस अपलोड करण्यासाठी तसेच अर्ज रद्द झालेबाबत एस.एम.एस पाठविण्यात येत आहे.
- शेतक-यांनी विहित मुदतीमध्ये ड़ॉक्युमेट अपलोड न केल्यास त्यांचा अर्ज रद्द झाल्यावर प्रतिक्षा यादीतील शेतक-यांची निवड करण्यात येत आहे.

नोव्हेंबर २०२१ अखेर पोर्टल वर १८ लाख पेक्षा अधिक शेतक-यांनी नोंदणी केली असून आतापर्यंत ४४ लाखापेक्षा अधिक लाभाच्या घटकांसाठी अर्ज प्राप्त आहेत. कृषि विभागाच्या सन २०२१-२२ अंतर्गत विविध योजनाकरीता महाडिबीटी पोर्टलवर ऑनलाईन अर्ज स्विकारण्याची प्रक्रिया २४ तास सुरु असते. तरी सर्व शेतकरी बांधवाना पोर्टलवरील विविध योजनांचा लाभ घेण्याकरिता पोर्टलवर नोंदणी करुन अर्ज करण्याचे कृषि विभागामार्फत आवाहन करण्यात येत आहे.

## यु ट्यूब चँनल

कृषी विभागाचे शेतकरी शेतीशाळा या नावाचे स्वतंत्र यु ट्यूब चँनल सुरु आहे. त्यावर खरीप हंगामाच्या पूर्व तयारीसाठी आवश्यक सर्व तांत्रिक माहितीच्या चित्रफिती उपलब्ध करून देण्यात येतात. या व्यतिरिक्त सोयबीन बियाणे उगवण क्षमता तपासणी बाबत ची चित्रफित, बांधावर खाते उपलब्ध करून देणे बाबतची माहिती कृषी विभागाने यु ट्यूबवर उपलब्ध करून देण्यात येतात.




## कृषि विषयक Blogspot आणि Autoreply ची सुविधा

- कृषि विभागाने कृषि विषयक योजनांच्या अद्यावत माहितीसाठी Blogspot तयार करण्यात आला आहे.
- सदर BlogSpot ची लिंक krushi-vibhag.blogspot.com आहे.
- कृषि विषयक योजनामध्ये योजनेची व्याप्ती, लाभार्थी निकष, अनुदान व अर्ज कुठे करावा याबाबत माहिती देण्यात आली आहे.
- कृषि विभागाच्या जवळपास २७ योजनांचा समावेश केला असून त्यात कृषि विभाग व जिल्हा परिषद यांच्यामार्फत राबिवण्यात येणा-या योजनांचाही समावेश करण्यात आला आहे व विविध योजनांची सविस्तर माहिती देण्यात आली आहे.
- **कृषि विभाग Whats app number – ८०१०५५०७८०**




- कृषि विषयक योजनांची माहिती मिळवण्यासाठी ८०१०५५०७८० या Whatsapp क्रमांकावर नमस्कार किंवा Hello हा शब्द टाईप करुन पाठवल्यास आपणास स्वागत संदेश प्राप्त होतो.
- यामध्ये कृषि विभागाच्या प्रचलित योजनाबाबत संक्षिप्त शब्द दिले आहेत.

उदा. Well, Mech, Hort इत्यादी टाईप करुन वरील क्रमांकावर पाठवल्यास आपणास पाहिजे असण्या-या योजनेची माहिती उपलब्ध होते.

- **महाकृषी मोबाईल ॲप्लिकेशन व वेब पोर्टल** – (URL – http://krishi-helpdesk.com/krishi-backend/user/login)- कृषि विभागातील क्षेत्रिय अधिकारी आणि संबंधित क्षेत्रातील भाग धारकांसाठी एकच व्यासपीठ तयार करणे हे कृषी विभागाचे ध्येय असून विभागाने **महाकृषी** व्यासपीठाचे विकसन हाती घेतले आहे. महाकृषी मोबाईल ॲप्लिकेशन व वेब पोर्टल हे क्षेत्रीय स्तरावरील अधिकारी/कर्मचारी यांच्या कामाची व एकंदरीत कृषि विषयक माहिती संकलित करण्यासाठी विकसित करण्यात येत असून या प्लॅटफॉर्म द्वारे कृषी स्थान पदानुक्रम डिजिटल केली जाते म्हणजे विभाग, जिल्हा, उपविभाग, तालुका, मंडळ, सजा, गाव आणि त्याचप्रमाणे प्रत्येक ठिकाणचे संबंधित क्षेत्र अधिकारी ऑन बोर्ड केले जात आहेत म्हणजे कृषी आयुक्तालय ते कृषि सहाय्यक पर्यंतच्या विविध क्षेत्रीय स्तरावरील क्रियाकलाप (Activities) व्यवस्थित करण्यास तसेच त्यांच्या सेवांच्या वापरासाठी इतर कोणत्याही संबंधित विद्यमान अनुप्रयोगासह एकत्रित करण्यास सक्षम करेल.

**महाकृषी ॲप्लिकेशन मध्ये समाविष्ट असलेली मॉड्यूल.**

**१) ऑफिसर्स मॅपिंग**
**२) लोकेशन मॅपिंग**
**३) ऑर्चर्ड मॅपिंग**
**४) शेतीशाळा**
**५) उत्पादक वितरक नोंदणी**
**६) प्रशिक्षण मॉड्यूल**
**७) कृषी विकास आराखडा**

## क्रॉपसॅप

- (URL - cropsap.maharashtra.gov.in) हे वेब पोर्टल व मोबाईल ॲप्लीकेशन असून शेतक-यांना वेब पोर्टल वर पिक निहाय, जिल्हानिहाय किड रोग पातळी व व्यवस्थापनाचे सल्ले (advisory) वेळोवेळी Publish केले जातात.
- पिकावरील किड अथवा रोग सर्वेक्षण व सल्ला प्रकल्प (क्रॉपसॅप) अंतर्गत पिकाचे सर्वेक्षण करुन किड अथवा रोगांच्या प्रादुर्भावाबाबत शेतक-यांना उपाय योजना व सल्ला मोबाईलवर एसएमएसद्वारे पाठविला जातो, त्यासाठी केंद्र पुरस्कृत किसान एसएमएस सेवेचा वापर केला जात आहे.




## क्रॉपवॉच -

- (URL - cropwatch.maharashtra.gov.in/cis/Login.jsp) शेतकरी /कृषि विभागातील कार्यरत यंत्रणेसाठी तालुकानिहाय, जिल्हा निहाय, विभाग निहाय पिक पेरणी अहवाल उपलब्ध आहेत. सदर अहवाल दर आठवड्याला अपडेट करण्यात येतो.
- हंगामातील आठवडानिहाय पिक लागवडीखालील क्षेत्राची ऑनलाईन माहितीसाठी ही प्रणाली वापरली जाते. यामध्ये कृषि विभागामार्फत तालुकानिहाय लागवड क्षेत्राची माहिती/आकडेवारी संकलित केली जाते. त्यानुसार जिल्हा/तालुका/विभाग/राज्य निहाय पिक निहाय लागवडीचे क्षेत्र, मागील वर्ष व सरासरी तुलनात्मक आकडेवारी अहवाल संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.







Agriculture Reports / कृषि पिकपेरणीचे रीपोर्ट

| Sr. No. | Report Place Level | Report Name |
|---|---|---|
| 01 | Taluka Level Sowing Report | 01 - Crop wise sowing report for taluka |
| 02 | District Level Sowing Report | 01 - Crop wise sowing report for district<br>02 - Taluka wise / crop wise sowing report for district<br>03 - Taluka wise / crop group wise sowing report for district<br>04 - District wise crop sown graph report<br>05 - District wise crop group sown graph report |
| 03 | Division Level Sowing Report | 01 - Crop wise sowing report for division<br>02 - District wise / crop wise sowing report for division<br>03 - District wise / crop group sown report for division<br>04 - Division wise crop sown graph report<br>05 - Division wise crop group sown graph report |
| 04 | State Level Sowing Report | 01 - Crop wise sowing report for state<br>02 - Taluka wise / crop wise sowing report for state<br>03 - District wise / crop wise sowing report for state<br>04 - Division wise / crop wise sowing report for state<br>05 - Taluka wise / crop group wise sowing report for state<br>06 - District wise / crop group wise sowing report for state<br>07 - Division wise / crop group wise sowing report for state<br>08 - Taluka wise sowing intensity report for state<br>09 - District wise sowing intensity report for state<br>10 - Taluka wise new plantation sugarcane report<br>11 - District wise new plantation sugarcane report<br>12 - Taluka wise sugarcane for crushing report<br>13 - District wise sugarcane for crushing report<br>14 - State crop wise sown graph report<br>15 - State crop group wise sown graph report |

Powered by Department of Agriculture Maharashtra Government Designed and Developed by MahaIT

**पर्जन्यमापन आणि विश्लेषण – (maharain.maharashtra.gov.in )**

- सदरचा प्रकल्प हा एसएमएसद्वारे दैनंदिन पावसाची आकडेवारी संकलित करून जनतेला माहिती उपलब्ध करून देण्यासाठी असून यामध्ये राज्यातील २०६५ महसूल मंडळांची पर्जन्यविषयक नोंदी तथा सरासरी व मागील वर्षाची तुलनात्मक माहिती पाहता येते. प्रत्येक महसूल मंडळात पर्जन्यमापक यंत्र बसविले असून राज्यातील २०६५ राजस्व मंडळ अधिकारी पावसाची नोंद घेऊन एमएसद्वारे माहिती पाठवितात.
- सन १९९७ पासूनची अद्यावत माहिती **maharain.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर ऑनलाईन उपलब्ध असून ती तुलनात्मक स्वरुपात भौगोलिक माहिती प्रणाली नकाशाद्वारे (GIS maps) राज्य, जिल्हा व तालुकानिहाय उपलब्ध आहे. विभागनिहाय राज्याचा नकाशा व मंडळ निहाय सर्व जिल्ह्यांच्या नकाशाद्वारे पावसाच्या तीव्रतेनुसार वेगवेगळ्या रंगनिर्देशकाप्रमाणे माहिती मिळते.
- महारेन पोर्टलवरील माहिती स्टेट डाटा बँक पोर्टलवर (https://mahasdb.maharashtra.gov.in) सुध्दा उपलब्ध आहे.
- पर्जन्यमापन व विश्लेषण या प्रणालीस Skoch Order of Merit २०१४ पारितोषिक देवून गौरविण्यात आले आहेत.

**ई-परवाना:- कृषि निविष्ठा परवाना व्यवस्थापन**

- बियाणे, खते व किटकनाशके या कृषि निविष्ठाची विक्री व उत्पादन करण्यासाठी लागणारा परवाना सदर प्रणालीद्वारे ऑनलाईन प्राप्त होतो. तसेच यामध्ये प्रामुख्याने परवाना व्यवस्थापन, निविष्ठा तपशिल व विक्री अहवाल याबाबत माहिती आहे. निविष्ठा व्यवस्थापन कार्यवाही अंतर्गत नमुने काढण्यासाठी - ई-इन्सपेक्टर व नमुने तपासण्यासाठी - ई-लॅब या प्रणाली विकसित करण्यात येत आहेत.
- ई-परवाना प्रणालीस Skoch Order of Merit २०१३ आणि २०१४, PSU पारितोषिक २०१४, राज्य ई-गव्हर्नन्स पारितोषिक २०१३, ई महाराष्ट्र पारितोषिक २०१३ आणि ई-इंडिया पारितोषिक २०१२ यांनी गौरविण्यात आलेले आहेत. राष्ट्रीय उपअभियान प्रकल्पांतार्गत राज्याची ई-परवाना प्रणाली देशभर वापरासाठी निवडण्यात आलेली आहे.
- सदर सुविधा आपले सरकार पोर्टलवर उपलब्ध आहे.